**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्तविभाग**

**राष्ट्रीय बातमीपत्र**

**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः 12.05.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

1. **पश्चिम बंगालमध्ये आज पंतप्रधानांच्या प्रचारसभांचा धडाका.**
2. **महाराष्ट्रासह नऊ राज्य, एका केंद्रशासित प्रदेशातल्या ९६ मतदारसंघात चौथ्या टप्प्यात उद्या मतदान.**
3. **उत्तराखंडमधील प्रसिद्ध बद्रिनाथ मंदिराचे दरवाजे खुले.**
4. **ब्राझीलमध्ये वादळ, मुसळधार पावसामुळे १२० हून अधिक मृत्यू तर ८५ हजार घरांना पुराचा फटका.**

**आणि**

5. **येत्या चार-पाच दिवसांत आंध्र प्रदेश, तेलंगणसह विविध राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा, तर महाराष्ट्रात वादळी वारे आणि विजांसह पाऊस पडण्याचा भारतीय हवामान विभागाचा अंदाज.**

**मोदी सभा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेच्या पुढच्या टप्प्यांमध्ये होणाऱ्या निवडणुकीसाठी आज पश्चिम बंगालमध्ये विविध सभा घेणार आहेत. त्यांचं काल कोलकत्यात आगमन झालं. त्यांची आज उत्तर २४ परगणा जिल्ह्यात जगतदल इथं सभा होणार आहेत. त्यानंतर हावडामधील पांचला, तसंच हुगळीमधील चिंशुरा आणि पर्शुरा इथं आयोजित केल्या जाणाऱ्या सभांना ते संबोधित करणार आहेत.

**लोकसभा निवडणूक तिसरा टप्पा**

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात एकंदर ६५ पूर्णांक ६८ शतांश टक्के मतदान झाल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. पुरुष मतदारांपैकी ६६ पूर्णांक ८९ शतांश टक्के मतदारांनी, महिला मतदारांपैकी ६४ पूर्णांक ४१ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याची सुधारित आकडेवारी निवडणूक आयोगानं जाहीर केली आहे.

आसाममधील सर्वाधिक म्हणजे ८५ पूर्णांक ३४ शतांश टक्के महिला मतदारांनी आपला हक्क बजावला, तर पश्चिम बंगालमध्ये हे प्रमाण ८३ टक्के इतकं होतं. उत्तर प्रदेशात मात्र सर्वांत कमी म्हणजे ५६ टक्के महिला मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**लोकसभा प्रचार**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातला प्रचार काल समाप्त झाला. या निमित्तानं ठिकठिकाणी प्रचार सभा, रोड शो यांचं आयोजन करण्यात आलं. या टप्प्यात नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या ९६ मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होणार आहे. आंध्र प्रदेशमध्ये एकाच टप्प्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी, तर ओडिशा विधानसभेसाठीच्या पहिल्या टप्प्यासाठीचा प्रचारही काल संपला. आंध्र प्रदेशात १७५ मतदारसंघांमध्ये, तर ओडिशात १४७पैकी २८ मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होणार आहे. पंतप्रधान आणि भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांच्या काल ओडिशात तीन ठिकाणी आणि झारखंडमध्ये एका ठिकाणी अशा चार प्रचारसभा झाल्या. केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते अमित शाह यांनी तेलंगणातील विकाराबाद इथं, तर भाजपाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आंध्र प्रदेशातील तिरुपती इथं सभा घेतली. कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी बिहारमधल्या समस्तीपूर इथं, पक्षाचे वरिष्ठ नेते राहुल गांधी यांची आंध्र प्रदेशातील कडापा मतदारसंघात, तर राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांची दरभंगा इथल्या अलिनगर इथं सभा झाली.

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात महाराष्ट्रातल्या पुणे जिल्ह्यातल्या पुणे, शिरुर आणि मावळ या मतदारसंघांसह अहमदनगर, शिर्डी, नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर आणि बीड इथं उद्या मतदान होणार आहे. पुण्यात महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांनी प्रचारसभा घेतली. देशाच्या प्रगतीसाठी आणि सुखसमृद्धीसाठी भाजपाच्या मागे खंबीरपणे उभे राहा असं आवाहन गडकरी यांनी यावेळी केलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही पुण्यात प्रचारसभा झाली. ही निवडणूक देशाचा नेता निवडण्यासाठी आहे. देश मजबूत करण्यासाठी नरेंद्र मोदी यांच्यामागे भक्कमपणे उभे राहा असं आवाहन फडणवीस यांनी केलं. शिरूर लोकसभा मतदार संघात महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रचारसभा घेतली. लोकशाही टिकवायची असेल तर नेहरू आणि गांधींचे विचार मजबूत करायला हवेत असं पवार म्हणाले. ही निवडणूक लोकशाही वाचवण्यासाठी आहे असं काँग्रेस नेते अभिषेक मनू संघवी काल पुण्यात श्रमिक पत्रकार संघाच्या वतीनं आयोजित वार्तालाप कार्यक्रमात म्हणाले. सरकार स्थापनेसाठी 272 इतकं संख्याबळ आवश्यक असताना त्यांना 400 पार कशासाठी हवे आहेत असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

काँग्रेसच्या नेतृत्वातल्या सरकारांनी अनुसूचित जाती जमातींच्या कल्याणासाठीचे कायदे तसंच आदिवासी समाजासाठीचा वनहक्क कायदा केला, असं काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी नंदुरबारमध्ये झालेल्या सभेत म्हणाल्या.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविधभारतीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**बद्रिनाथ**

उत्तराखंडमध्ये चामोली जिल्ह्यातील प्रसिद्ध बद्रिनाथ मंदिराचे दरवाजे आज पहाटे उघडण्यात आले. भाविकांनी मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. संपूर्ण मंदिराला झेंडूच्या फुलांची मोठी सजावट करण्यात आली आहे. भाविकांना दर्शन योग्य पद्धतीनं घेता यावं यासाठी प्रशासनानं जय्यत तयारी केली आहे. बद्रिनाथचे दरवाजे खुले झाल्यामुळे चारही धामांमध्ये आता भाविकांना दर्शन घेता येणार आहे. केदारनाथ, यमुनोत्री आणि गंगोत्री या मंदिरांचे दरवाजे शुक्रवारी उघडण्यात आले.

**मेफेड्रोन**

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी इथे मेफेड्रोन हा अंमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी दोन कथित तस्करांना अटक केली आहे. या मेफेड्रोन ची किंमत अंदाजे 8 लाखांहून अधिक आहे. पोलिसांनी 8.25 लाख रुपये किमतीचे दोन कथित अमली पदार्थ तस्करांना अटक केली आहे. मोहम्मद सुदेश अबुसाहेब अन्सारी आणि विकास दिनेश गुप्ता अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

**मणिपूर निदान**

मणिपूरमध्ये अनेक महिन्यांनंतर काल कोरोनाचा संसर्ग झालेल्या एका रुग्णाची नोंद झाली. एका ६६ वर्षाच्या महिलेला संसर्ग झाला असून, इंफाळमधील जवाहरलाल नेहरू वैद्यकीय विज्ञान संस्थेत तिला उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. छातीत दुखत असल्यामुळे तिला रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तेव्हा झालेल्या उपचारांमध्ये कोरोनाचं निदान झालं. मात्र, काळजीचं कोणतंही कारण नसून रुग्णालय सज्ज असल्याचं रुग्णालयानं म्हटलं आहे.

**पुरुष कुस्ती पटू**

भारतीय कुस्तीपटू अमन शेरावत पॅरिस मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. ऑलिम्पिक स्पर्धेसाठी पात्र ठरलेला तो पहिलाच पुरुष मल्ल आहे. तुर्कीयेमधील इस्तंबूल इथे काल झालेल्या जागतिक कुस्ती ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत पुरुषांच्या ५७ किलो फ्रीस्टाइल गटात अमन पॅरिस ऑलिंपिकसाठी पात्र ठरला. यापूर्वीचे सर्व पाच पात्रता जागा भारतीय महिला कुस्तीपटूंनी मिळवल्या आहेत.

**दिव्याग-भारतोलंन**

थायलंडमधील पटाया इथे झालेल्या दिव्यांगांच्या भारतोलन विश्वचषक स्पर्धेत, भारताच्या सकिना खातून हिने दोन कांस्यपदकं पटकावली. तिने महिलांच्या 55 किलो पर्यंतच्या स्पर्धेत 93 किलो वजन उचलून सर्वोत्कृष्ट लिफ्ट आणि एकूण लिफ्ट प्रकारात ही पदकं मिळवली. महिलांच्या 67 किलोपर्यंतच्या स्पर्धेत, कस्तुरी राजमणी हिने 105 किलो वजन उचलून कांस्यपदक मिळवले. या स्पर्धेत, पुरुषांच्या 65 किलोपर्यंतच्या गटात भारताच्या अशोक मलिकने 197 किलो वजन उचलून

सुवर्णपदक पटकावले, तर पुरुषांच्या 49 किलोपर्यंतच्या गटात परमजीत सिंगने 162 किलो वजन उचलून रौप्यपदक मिळवलं.

**भालाफेक**

भारताच्या साहिल सिलवाल आणि विक्रांत मलिक यांनी स्लोव्हेनियामधील क्रंज इथे झालेल्या पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्यपदकं पटकावली. साहिलने 77.81 मीटर, तर विक्रांतने 75.28 मीटर अंतर नोंदवले. भालाफेकीतील 89 पूर्णांक 94 मीटर चा राष्ट्रीय विक्रम नीरज चोप्राच्या नावावर आहे.

**भुवनेश्वर अँथलेटिक्स**

ओडिशातील भुवनेश्वर इथं आजपासून राष्ट्रीय महासंघ वरिष्ठ ऍथलेटिक्स स्पर्धा सुरू होत आहे. या स्पर्धेत भालाफेकपटू नीरज चोप्रा आज आपल्या कामगिरीचं दर्शन घडवणार आहे. जेस्विन अल्ड्रिन, तेजिंदरपालसिंग तूर, अमोज जेकब, मुहम्मद अजमल हे खेळाडूही या स्पर्धेत सहभागी होत आहेत.

**ब्राझील**

ब्राझीलमध्ये झालेल्या वादळ आणि मुसळधार पावसामुळे 120 हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून, 756 लोकांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे, तर 141 लोक बेपत्ता आहेत. पुराचा फटका बसल्यामुळे 85 हजारांहून अधिक घरं उद्ध्वस्त झाली असूंन, 71 हजारांहून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवलं असल्याचं सूत्रांनी सांगितलं. पुरामुळे वीज आणि जलशुद्धीकरण केंद्रांचं ही नुकसान झालं आहे, परिणामी, नागरिकांना पिण्याचे पाणी आणि वीज मिळत नाही. पावसाची तीव्रता आजही राहणार असून गुआइबा नदीने धोक्याची पातळी ओलंडल्याने, या नदीवरील पाच धरणं फुटण्याचा धोका अधिका-यांनी वर्तवला आहे.

**हवामान**

आंध्र प्रदेश, तेलंगण, ओडिशा, तमिळनाडू, कर्नाटकात विविध ठिकाणी पुढच्या दोन-तीन दिवसांमध्ये मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. मध्य प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्रात काल अनेक जिल्ह्यांमध्ये सोसाट्याच्या वाऱ्यांसाह मुसळधार पाऊस झाला. कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले इथं ढगफुटीसदृश पाऊस पडला. आजही अनेक ठिकाणी पाऊस तर काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. सध्या सुरू असलेल्या पावसामुळे, देशातल्या अनेक भागांमध्ये असलेली उष्णतेची लाट कमी झाली आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**